ठाणेवैभव

# माझे नेत्रालय

## अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून तिरळेपणावर उपचार डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटलमध्ये

डोळ्यातील स्नायूंची हालचाल सुसूत्रतेने न झाल्यामुळे उद्भवणाऱ्या विकाराला तिरळेपणा म्हणतात. हा विकार एका अथवा दोन्ही डोळ्यात असू शकतो. तिरळेपणाचे दोन प्रकार आहेत. एक डोळ्याच्या आतील बाजूस आणि दुसरा बाहेरील बाजूस. काही वेळेस डोळ्यात खाली अथवा वरही असू शकतो. तिरळेपणा हा जन्मतःच असू शकतो अथवा वयाच्या काही वर्षांनंतर मुलांमध्ये तिरळेपणा आढळून येतो. मुलांमधील तिरळेपणा त्वरित समजून येत नाही. काही वेळा फोटो काढल्यावर दिसतो. अशावेळी पालकांनी घाबरून न जाता मुलांना डॉक्टरांकडे नेणे आवश्यक आहे. ज्या मुलांचा डोळ्यांचा नंबर जास्त असेल त्यांना तिरळेपणा असू शकतो. तो चष्म्याच्या आधारे नियंत्रित करता येतो. डोळ्याची वाढ होत असताना त्यातील ॲनोमली किंवा काही अडचण निर्माण झाली तर तिरळेपणा होण्याची शक्यता असते. त्यावेळी नेत्रचिकित्सकांकडून डोळ्यांचे स्कॅनिंग केले जाऊ शकते. काही वेळेस डोळ्यांचा सिटीस्कॅन अथवा



रुग्ण
**शुभम शिरसाट**

एमआरआय देखील केला जातो. जो तिरळेपणा चष्म्याच्या साहाय्याने नियंत्रित करता येत नाही त्यावेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित तपासणी करून तिरळेपणाचे प्रमाण ठरवले जाते. आणि शस्त्रक्रिया करून तिरळेपणा कमी करू शकतो. तिरळेपणामुळे कायमस्वरूपी नजर जाऊ नये यासाठी त्वरित डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करून घेणे गरजेचे आहे. तिरळेपणामुळे नजर जर कमी झाली असेल तर वयाच्या 5 ते 10 वर्षांपर्यंत उपचार करणे महत्वाचे असते. डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटमध्ये तिरळेपणावरील सर्व उपचार उपलब्ध आहेत. शस्त्रक्रियेसाठी गाडगीळ हॉस्पिटलमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यात मुलांसाठी काही सॉफ्टवेअर प्रोग्रॅम्स आणि काही ॲक्टिव्हिटी देखील असतात. याच्या मदतीने डोळ्यांची नजर वाढवता येते. याचा फायदा मिळाला तिरळेपणाची शक्यता असणारे शुभम शिरसाट यांना. त्यांनी डॉ. गाडगीळ हॉस्पिटलमधून तिरळेपणा आणि लॅसिकवर उपचार घेतले. शस्त्रक्रिया करून त्यांची नजर वाढली आणि कायमचा चष्मा गेल्याने ते आनंदित असून त्यांनी डॉ गाडगीळ यांचे आभार मानले.

MAI Edition
20240224 Page No. 6
http://erelego.com/